# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०३/०३/२०२२ (गुरूवार)

---

## जिवांनीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणा—या आरोपींना अटक

**पोलीस स्टेशन सावनेर** – अंतर्गत चार्जर बार जवळ सावनेर, ०५ किमी. पश्चिम दिनांक ०१/०३/२०२२ चे २२/३० वा. दरम्यान यातील, फिर्यादी जखमी प्रकाश घ्यार याने चार्जर बार जवळ रस्त्यावर लघवी करत असलेल्या बबलू तिवारी याला “रस्त्यावर लघवी कशाला करतो” असे हटकल्याचे कारणावरून यातील आरोपीतांनी संगनमत करून त्यांचे जवळील चाकूने प्रकाश घ्यार यास जिवांनीशी ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे मानेवर, खांदयावर व पाठीमागील बाजूवर चाकूने मारून गंभीर जखमी करून जिवांनीशी ठार मारण्याचा प्रयत्न केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – सुभाष अजाबराव घ्यार, वय ४६ वर्ष, रा. गजानन मंदीराजवळ प्रोफेसर कॉलनी, सावनेर जि. नागपूर यांचे रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे आरोपी नामे **१) बबलू तिवारी वय २५ वर्ष २) शिवप्रताप राव, वय ३३ वर्ष दोन्ही रा. सावनेर.** यांचे विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३०७, ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, नमुद दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास स.पो.नि. सतिश पाटील पो.स्टे. सावनेर मो. क्र. ७६२०७२४४४८ करीत आहेत.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** – अंतर्गत जामा मस्जिद समोर जलालखेडा ४०० मिटर अंतर. दिनांक १९/०२/२२ चे १६/३० वा. दर. यातील **आरोपी नामे १) पंकज दिलीप मानकर वय २० वर्ष रा. गणेशपुर ता. वरूड** हा त्याचे मोटार सायकल क्र. एम.एच. ४० बी. एक्स.९७२८ वर ट्रिपल सिट बसवुन काटोल ते वरूड रोडनी जात असतांना मौजा जलालखेडा जामा मस्जीद समोर गावात जाणा—या रोड वरूड टर्न घेत असतांना वरूड कडुन नागपुर कडे जाना—या **आरोपी क्र. ०२) अमित दत्तु बोरकर वय ३० रा. नागपुर** याने त्याचे ताब्यातील कार क्र..एम.एच. ३१ एफ. सी. ४२२७ भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन टर्ण घेत असलेल्या मोटार सायकल ला धडक दिली असता मोटार सायकल चालक व त्याचे पाठीमागे बसलेले ईसम जखमी झाले असुन फोर व्हिलर मधील एका ईसमास दुखापत झाली.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– दिनेश जोगेकर पो.स्टे.जलालखेडा यांचे रिपोर्टवरून पोस्टे जलालखेडा येथे नमुद आरोपीविरूध्द कलम २७९,३३७,३३८ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री गावंडे पो.स्टे. जलालखेडा मो.न.8975755969 करीत आहेत.

## मोपेड गाडी चोरी

**पोलीस स्टेशन कन्हान :–** अंतर्गत जैस्वाल देशी दारू भट्टी समोरील रोडवर कन्हान ता. पारशिवनी दिनांक ०१/०३/२०२२ चे १५/०० वा. ते १५/३० वा. दर. यातील फिर्यादी हा जैस्वाल देशी दारूची भट्टी, कन्हान समोरील रोडवर आपले एक्टीवा ५जी, गाडी क्र. एम.एच–३१–एफ.एम.–५१६२ किंमती ९०,०००/रू. ची गाडी ला चाबी लावुन मित्रासोबत दारू पिण्यासाठी भट्टीच्या आत गेले असता व तेथून परत गाडी ठेवलेल्या ठिकाणी आला असता त्याला त्याची गाडी दिसली नाही. त्याने आजुबाजुला विचारपुस करून शोध घेतला असता मिळुन आली नाही.

सदर प्रकरणी क्रिष्णा धनराज मदन वय ३१ वर्ष रा. प्रगती नगर सुपर टाउन, कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि चा दाखल करण्यात आला. आरोपीचा शोध सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक जावीद शेख मो. क्र. ९४०३६९२७६६ हे करीत आहे.

## निष्काळजीपणे ट्रक चालविल्याने कापुस जळुन लाखो नुकसान

**पोलीस स्टेशन पारशिवनी :–** अंतर्गत मौजा नयाकुंड ते आमडी रोड टर्निंग जवळ ०६ कि.मी. पुर्व. दिनांक ०२/०३/२२ चे ००/१५ वा. दरम्यान. यातील ट्रक क्र. डबल्यु बी. २३. एफ ०५१३ चे चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्यांचा ट्रक वरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पल्टी होवुन ट्रकला लाग लागल्याने ट्रक मधील कापसाची गाडी इलेक्ट्रीक तारावर पडल्याने स्पार्क होवुन कापसाच्या गाठ्याला आग लागुन ट्रक व कापसाचे गाठ्या जळुन अंदाजे ५५,००,००० (लाख) रू. चे नुकसान झाले.

**सदर प्रकरणी** फिर्यादी सरतर्फे पो. हवा. रविंद्र चौधरी पो.स्टे.पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पोस्टे पारशिवनी येथे आरोपी नामे – विरेंद्र रामदयाल प्रसाद वय ५५ वर्ष रा. बेनसार ता. जि शिवाण (वेस्ट बंगाल)यास सुचनापत्रावर सोडण्यात आले. नमुद आरोपीविरूध्द कलम २७९, ४२७ भादवी. सहकलम. १८४ मोटर वाहन कायद्यान्वयें गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा. रविंद्र चौधरी पो.स्टे. पारशिवनी मो.क्र. ९१४६८६५३४२ करीत आहे.

## किटकनाशक औषध प्राशन केल्याने मृत्यु

**पोलीस स्टेशन कन्हान–** अंतर्गत हरिहर नगर कांद्री कन्हान. २किमी.उ. यातील मृतक हिने दि २८.०२.२०२२ चे रात्री ११.३० वा. चे सुमारास आपले राहते घरी कोणत्यातरी अज्ञात कारणाने तांदळात टाकण्याचे औषध प्राशन केल्याने तिची प्रकृती खराब झाल्याने तिला प्राथमिक उपचारा करीता खाजगी रूग्नालय कन्हान येथे उपचार कामी घेवुन गेले तेथुन रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे दिनांक ०१.०३.२२ रोजी भरती केले उपचार दरम्यान डॉ. नी तिला तपासुन दि .०१.०३.२०२२ चे सकाळी ०७.३० वा. मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – आनंद श्रावण समशेर, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र १ हरीहर नगर, कान्द्री यांचे रिपोर्टवरून पोस्टे कन्हान येथे मर्ग दाखल करण्यात आला आहे. पुढील मर्ग चा तपास ना.पो.शि मंगेश ढबाले मो. क्र. ९९२३६२१२७५ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**